# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ५०-२३ दिनांक :- ११/०२/२०२३

## मोटार सायकल चोरी करणा-या आरोपीस अटक करुन एकुण ०३,९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत- माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ०७/०२/२०२३ रोजी फिर्यादी नामे श्री. निहाल संजय घरत, वय ३१ वर्षे यांनी त्यांची ओला कंपनीची एस-१ प्रो इलेक्ट्रीक मोटार सायकल ही सकाळी १०.०० वा. ते रात्रौ ०८.३० वा. च्या सुमारास नायगाव पश्चिम ब्रिजच्या बाजुला ता. वसई जि. पालघर यां ठिकाणी पार्क करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केल्याबाबत तक्रार प्राप्त झालेने माणिकपुर पोलीस ठाणेत गु.र.क्र. ४२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने वरिष्ठांचे मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. श्री. सचिन सानप व पोलीस अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त माहितीच्या अनुषंगाने आरोपीत नामे चंद्रेश गणेशप्रसाद पाठक, वय २३ वर्षे, रा. महाजन मार्ग, जय अंबेमाता मंदिराजवळ, दहीसर पुर्व, मुंबई यास सापळा कारवाई करुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी वरनमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास सदर गुन्हात अटक केली आहे. अटक आरोपीस अधिक विचारपुस करता त्यांनी माणिकपुर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात व इतर ठिकाणी मोटर सायकल चोरल्याचे सांगितल्याने त्याचेकडुन ५ मोटर सायकल असा एकुण ३,९०,०००/- किंमतीच्या मोटर सायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. माणिकपुर पोलीस ठाणे दाखल असलेले खालील ०२ गुन्हे उघड करण्यात आले आहेत व ३ गुन्हयांचा तपास चालु आहे.

| अनु.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं., कायदा, कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर | गु.र.क्र. ४२/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९ |
| २. | माणिकपुर | गु.र.क्र. ३२/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९ |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ अति. कार्यभार परिमंडळ २, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा अति. कार्यभार वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. श्री. सचिन सानप, सचिन शिंदे, पो.उ.नि. तडवी, तुकाराम भोपळे, पो. हवा. चौधरी, पाटील, चंदशिवे, चव्हाण, पो. अंम. कानडे यांनी केलेली आहे.